वृत्तपत्राचे नाव: दै. लोकमत प्रकाशन स्थळ : सातारा दिनांक : १३.६.२०२१

# तिसरी लाट थोपविण्यास पुढाकार

## पालकमंत्री : भारत फोर्जकडून २४ गावांना केली मदत

लोकमत न्यूज नेटवर्क

सातारा : कोरोनाच्या दुसऱ्या लाटेत देशाचे, राज्याचे व जिल्ह्याचे मोठे नुकसान झाले आहे. महसूल, पोलीस व आरोग्य विभाग पहिल्या कोरोनाच्या लाटेपासून काम करीत आहेत. आता कोरोनाची तिसरी लाट येण्याचा अंदाज व्यक्त होत आहे. या लाटेचा प्रभाव रोखण्यासाठी शासनाच्या सर्व विभागांची मदत घेऊन तिसऱ्या लाटेचा अधिकचा प्रभाव जाणवणार नाही यासाठी आतापासूनच प्रयत्न सुरू केले पाहिजेत. या कामात नागरिकांनी पुढाकार घेतला पाहिजे, असे आवाहन पालकमंत्री बाळासाहेब पाटील यांनी केले.

भारत फोर्ज लि. पुणे यांच्याकडून सी.एस.आर. निधीतून सातारा जिल्ह्यातील कोरेगाव, खटाव व माण तालुक्यांतील एकूण २४ गावांना कोविड-१९ साठी लागणाऱ्या भौतिक सुविधा व साधनांचे वितरण धामणेर ता. कोरेगाव येथे पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या वितरण प्रसंगी जिल्हाधिकारी शेखर सिंह, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनय गौडा, प्रांताधिकारी ज्योती पाटील, तहसीलदार अमोल कदम, भारत फोर्जच्या लिना देशपांडे, सुनील माने, शहाजी क्षीरसागर यांच्यासह विविध गावांचे सरपंच उपस्थित होते. जिल्हाधिकारी शेखर सिंह, लिना देशपांडे यांनी व्यक्त केला.




धामणेर, ता.कोरेगाव येथे २४ गावांना विविध साहित्यांचे वाटप पालकमंत्री बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते झाले.